**नि.दि.दा.क्र.२४/२०२०**
**शंकर वि. देवकाबाई**
**नि.१६ खाली**

**पुढील सरतपास वादतर्फे श्री एम.डी. पालीवाल वकील साहेब शपथेवर सुरुः**

**१.** माझे शपथपत्र नि.१६ वर दाखल केले आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

**२.** नि.१८ च्या कागदयादीसोबत अ.क्र.१ वर नगर पंचायत पारशिवनी यांच्याकडे वाद मिळकतीचे आकारणी पत्र दाखल केले आहे. त्यास **नि.२१** देण्यात येत आहे. अ.क्र.२ वर भु.अ. यांच्याकडील वादमिळकतीचा नकाशा दाखल आहे. त्यास **नि.क्र.२२** देण्यात येत आहे. अ.क्र.३ वर भु.अ. यांच्यामार्फत वादमिळकतीची केलेली मोजणी व त्याचा नकाशा दाखल आहे. सदर मोजणी दि.०३–०९–२०१९ करण्यात आली होती. त्यास आर्टीकल अ ओळखीपुर्ती देण्यात येते. अ.क्र. ४ ते १० वर मुख्य अधिकारी नगरपंचायत पारशिवनी, जिलहाधिकारी नागपूर, उपविभागीय अधिकरी रामटेक यांना दिलेल्या अर्जाची स्थळ प्रत दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.२३ ते २९** देण्यात येत आहे. अ.क्र.११ व १२ वर माहीती अधिकाराखाली केलेल्या अर्जाची व अपिलाची स्थळ प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.३० व ३१** देण्यात येत आहे. अ.क्र.१३ वर मुख्याधिकारी यांना दिलेल्या अर्जाची स्थळ प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.३२** देण्यात येत आहे. अ.क्र.१४ ते १८ वर नगर पंचायत पारशिवनी यांनी मला केलेला पत्र व्यवहाराची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.३३ ते ३७** देण्यात येत आहे. अ.क्र.१९ व २० वर उपविभागीय कार्यालय रामटेक आणि तहसील कार्यालय पारशिवनी यांच्याकडून प्राप्त झालेले पत्राची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.३८ व ३९** देण्यात येत आहे. अ.क्र.२१ वर मुख्याधिकारी नगर पंचायत यांनी दिलेल्या पत्राची मुळप्रत दाखल आहे. त्यास **नि.क्र.४०** देण्यात येत आहे. अ.क्र.२२ वर जिल्हाधिकरी कार्यालय नागपूर यांचे पत्र. त्यास **नि.क्र.४१** देण्यात येत आहे.

३. नि.२० च्या कागदयादीसोबत अ.क्र.१ वर प्रतिवादीचे वादमिळकतीचे मालमत्ता पत्र दाखल केले आहे. त्यास **नि.४२** देण्यात येत आहे. अ.क्र.२ वर माझ्या वादमिळकतीचे मालमत्ता पत्र दाखल केले आहे. त्यास **नि.४३** देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास प्रतिवादीकरीता पुढील तारखेपर्यंत तहकूब.

**श्रवणोत्तर स्विकृती** **समक्ष**

**( ओ–जे कुलकर्णी )**
**दि–न्या–क–स्तर**
**पारशिवनी**
**दिनांक/०४–०९–२०२३**

**( ओ–जे कुलकर्णी )**
**दि–न्या–क–स्तर**
**पारशिवनी**

**उलटतपास प्रतिवादी क्र.१ व ३ करीता श्री एस.एम. कुशवाह वकील साहेबः**

**४.** मी ५ वा वर्ग शिकलो आहे. मला इंग्रेजी वाचता लिहीता येत नाही. माझी जागा प्रतिवादीकडे निघाल्याने मी त्यांच्याविरुध्द केस दाखल केली आहे. माझा घर क्र.११७० आहे. माझ्या घराची पुर्व पश्चिम लांबी ३० फुट व उत्तर दक्षिण लांबी ५० फुट आहे. माझ्याकडे घराचे विक्रीपत्र नाही. माझे घर १५० वर्षापुर्वीचे आहे. माझे घर १५० वर्षापुर्वीचे आहे हे दाखवण्याकरीता माझ्याकडे कोणतेही दस्त नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर १५० वर्षापुर्वीचे आहे हे मी प्रथमच न्यायालयात सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराची लांबी रुंदी मी आज न्यायालयात प्रथमच सांगत आहे. माझ्या नावाची ग्रामपंचायतमध्ये नोंद १९९८ मध्ये झाली. माझ्या भावाने सदर आजचा घर क्र.११७० हे घर तहसीलमध्ये येवून मला दिल्याचे सांगितले त्यावरुन ग्रामपंचायतला तशी नोंद झाली. हे म्हणणे खरे नाही की, मी घर क्र.११७० चा एकटाच मालक नाही.

प्रश्नः तुमच्या भावाने तुम्हास घर दिले याबाबत दस्त तयार केले होते काय?

उत्तरः दस्त तयार केले होते आज रोजी ते गहाळ झाले आहे.

प्रश्नः कोणता दस्त तयार केला होता ?

उत्तरः दस्ताचे नाव सांगता येणार नाही.

प्रश्नः घर क्र.११७० ही तुमची वडीलोपार्जीत मालमत्ता आहे काय ?

उत्तरः होय. या मालमत्तेमध्ये आम्ही ५ लोक वारस आहो. त्यांची नावे संभाजी राजारामजी वंजारी, शंकर राजारामजी वंजारी, महादेव राजारामजी वंजारी, अशोक राजारामजी वंजारी, सिंधुबाई राजारामजी वंजारी अशी आहे.

**५.** माझे दोन भाउ संभाजी व महादेवराव व सिंधुबाई मरण पावली आहे. हे म्हणणे खरे आहे की, या तिघांनी वारस आहे. सर्वांनी माझ्या बाजुने हक्क सोड लेख तयार केला होता.

सदर हक्क सोड लेख आज रोजी माझ्याकडे नाही. तहसीलमधील घराबाबतच्या दस्तांवर माझे नाव नोंदविले होते. सदर दस्त माझ्याकडे नाही. सदर दस्त प्राप्त करायला एक महीना लागु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, कोणताही हक्क सोड लेख तयार केला नाही.

६. देवकाबाई आणि सुरेश याचा घर क्र.२७३ आहे. सदर घराची आराजी मी सांगु शकणार नाही. सदर दावा दाखल करण्यापुर्वी मी घर क्र.२७३ चे दस्त प्राप्त केले नव्हते. देवकाबाई आणि सुरेश यांच्या घराचे क्षेत्रफळ मी सांगु शकत नाही. देवकाबाई व सुरेश हे माझ्या जन्माच्या पुर्वीपासून पारशिवनी येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, देवकाबाई व सुरेश हे पुर्वीपासून घर क्र.२७३ मध्ये राहतात. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील, बहीण व भाउ यांनी सदर प्रकरण दाखल करण्यापुर्वी देवकाबाई व सुरेशविरुध्द कोणतीही तक्रार केली नाही. मी माझे घर पाडण्याकरीता ग्रामपंचायतची परवानगी घेतली नव्हती कारण की त्यावेळी परवानगीची गरज नव्हती. माझे अर्धे घर पडले व अर्धे घर पाडायचे आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, माझे घर पुर्णपणे पडले होते. माझे घर पडल्याबाबत मी ग्रामपंचायतला अर्ज दिला नव्हता. मी नविन घर बांधण्याकरीता अर्ज दिला नव्हता मात्र मंजुरी घेतली होती.

७. माझ्या घराचा बांधकामाचा नकाशा नगर पंचायत किंवा ग्रामपंचायतकडून मंजुर करुन घेतला होता. कोणत्या तारखेला मंजुर करुन घेतला होता ते आठवत नाही. माझ्या घराच्या बांधकामाकरीता डेव्हलपमेंट चार्ज मागितला नसल्याने मी भरला नाही. मी मंजुर नकाशा व बांधकामाकरीता मंजुरीचा दस्त अभिलेखावर दाखल करु शकत नाही. ११४५ फुट बांधकामाचा नकाशा मंजुर केला होता. ग्रामपंचायतने नकाशा मंजुर केला त्याप्रमाणे मी बांधकाम केले. साक्षीदार पुन्हा सांगतो की, बांधकाम करता वेळेस आम्हाला काही जागा सोडायला सांगितली होती. मोरेश्वर व त्याच्या वडीलानी मला जागा सोडायला सांगितली होती. मी उत्तर दक्षिण १०६ फुट जागा सोडली होती. हे म्हणणे खरे नाही की मी जी जागा सोडली होती त्याबद्दल माझा काही वाद नाही. मी खुली सोडलेली जागा परत

मिळण्याकरीता कोणताही दावा केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, खुल्या सोडलेल्या जागेचा मी मालक नव्हता म्हणून मी कोणताही दावा केला नाही.  हे म्हणणे खरे नाही की, मी घर बांधकाम करते वेळेस खुली जागा सोडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पारशिवनी गावामधील प्रत्येकाच्या जागेचा कोणताही नकाशा नाही.

८.     हे म्हणणे खरे आहे की, देवकाबाई व सुरेशच्या घराचे बांधकाम पुर्ण झाले आहे. मी देवकाबाई व सुरेशविरुध्द सन २०१८ मध्ये तक्रार केली होती दिनांक मला आठवत नाही. मी तक्रारीचे दस्त अभिलेखावर दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, देवकाबाई व सुरेशने सन २०१८ मध्ये बांधकाम सुरु केले व २०१९ मध्ये बांधकाम पुर्ण झाले. हे म्हणणे खरे नाही की, याकेस शिवाय देवकाबाई व सुरेशविरुध्द मी कोणतीही केस दाखल केली नाही. मी देवकाबाई व सुरेश यांचे बांधकाम थांबवण्याकरीता सन २०१८ व २०१९ मध्ये या न्यायालयात कोणताही दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, देवकाबाई व सुरेश यांच्या बांधकामाबाबत कोणताही वाद नव्हता म्हणून मी दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दवेकाबाई व सुरेशचे बांधकाम पुर्ण झाल्याच्या एक वर्षानंतर मी केस दाखल केली.

९.     सदर दावा मी १०६ फुट जागा मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे. दावा दाखल करण्यापुर्वी मी माझी जागा किती व अतिक्रमण किती असा नकाशा तयार केला नव्हाता. मला नकाशा तयार करता येतो. घर क्र.३०४, २१९, २६९,२७४, कोणाचे आहे हे मला माहीत नाही. घर क्र.२७० ढोबळेचे आहे.  दाव्यासोबत जोडलेला नकाशा मी तयार केला नाही. दाव्यासोबत जोडलेला नकाशा भुमीअभिलेख कार्यालयाने तयार केला आहे.

प्रश्नः   दाव्यात लिहीलेली तारीख दि.०७/०४/२०१८ रोजी काय झाले होते?

उत्तरः   त्या रोजी नगरपंचायतमध्ये तक्रार करुन कळविले होते.

प्रश्नः   दाव्यात लिहीलेली तारीख दि.१३/०४/२०१८ रोजी काय झाले होते?

उत्तरः परत तक्रार केली होती.

प्रश्नः दाव्यात लिहीलेली तारीख दि.२३/०४/२०१८, २८/०४/२०१८, १८/०८/२०१८, ११/१०/२०१८, १८/०९/२०१८, २६/०४/२०१८, ०१/०९/२०१८, रोजी काय झाले होते?

उत्तरः तक्रार केली होती.

**१०**. हे म्हणणे खरे नाही की, वरील सर्व तक्रार खोटया आहे. दिनांक ०३/०९/२०१९ रोजी काय झाले होते मला माहीत नाही.

उलटतपास प्रतिवादीकरीता पुढील तारखेपर्यंत तहकूब.

**श्रवणोत्तर स्विकृती** **समक्ष**

**( जी. ओ. वानखडे)**
**दि–न्या–क–स्तर**
**पारशिवनी**
दिनांकः२५/०५/२०२४

**( जी. ओ. वानखडे)**
**दि–न्या–क–स्तर**
**पारशिवनी**